मध्य, दक्षिण भागातील भारतीय शेतकऱ्यांसाठी

# जीएचएच 029 स्ट्राँग कॉटन हायब्रिडचा भारतात प्रवेश






अमरावती : स्ट्राँग कॉटन हायब्रिडचे ब्रांड दाखविताना कंपनीचे अधिकारी व कर्मचारी.

प्रतिनिधी/ १जून

**अमरावती** : जीएचएच 029 बीजीआयआय हे नव्याने दाखल करण्यात आलेले श्रीराम बायोसीड जेनेटिक्सचे उत्पादन मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून महाराष्ट्रातील खान्देश, विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांमध्ये विशेष स्थान निर्माण करत आहे. सन १९९२ मध्ये स्थापन झालेली, श्रीराम बायोसीड जेनेटिक्स ही कंपनी उच्च उत्पन्न देणारे हायब्रिड बियाणे विकसित करून शेतकऱ्यांचे सबलीकरण करण्यासाठी कार्यरत आहे. कंपनीकडे स्वतःचे वैविध्यपूर्ण जर्मप्लासम असून,

## शेतकऱ्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न

कंपनी भारत, इंडोनेशिया, थायलंड, व्हिएतनाम, बांगलादेश, चीन, नेपाळ, कम्बोडिया व नेपाळ येथील शेतकऱ्यांनाही सेवा देत आहे. बायोसीड शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट बियाण्यांच्या संपूर्ण मूल्यसाखळीद्वारे करत आहे. अनेक वर्षे घातक कीटकांना प्रतिरोध व उत्पन्न हे आमच्या कॉटन हायब्रिडचे वेगळेपण आहे', असे कंपनी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले.

दक्षिण आशियाचे अध्यक्ष डॉ. शरद शर्मा आणि संशोधन संचालक व आग्नेय आशियाचे अध्यक्ष डॉ. परेश वर्मा यांनी सांगितले,

'कंपनीने बायोटेक्नालॉजीवर आधारित उत्पादने देण्यासाठी केलेल्या विशेष संशोधन व विकास प्रक्रियेतून जीएचएच 029 बीजीआयआय हे उत्पादन साकारले आहे. अन्य स्पर्धकांच्या तुलनेत जीएचएच 029 बीजीआयआय मध्ये उत्पन्नाच्या बाबतीत जास्त क्षमता आहे. इरिगेटेड व हाय मॅनेजमेंट सेग्मेंट यासाठी ते साजेसे आहे. महाराष्ट्रातील अमरावती, औरंगाबाद व जळगाव येथे आणि तेलंगणातील वारंगळ येथे यशस्वीपणे दाखल करण्यात आलेल्या या उत्पादनाला वर नमूद केलेल्या राज्यांमध्ये 2019 मधील खरिप हंगामात इरिगेटेड व हाय मॅनेजमेंट सेग्मेंट यामध्ये विस्तारण्यासाठी व स्थान मिळवून देण्यासाठी उत्तम पुरवठा जाळ्याचे पाठबळ दिले जाणार आहे.